# श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ

# राष्ट्रीय सेवा योजना

## भारत रत्न लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## Session -2021-22

दिनांक **१०-०२-२०२२**

यवतमाळ जिल्हा विकास समिती यवतमाळ द्वारा संचालीत श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ येथे दि. १० फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पीत करण्यात आली. भारत रत्न लता मंगेशकर यांचे दि ६ फेब्रुवारी २०२२ रोजी दु:खद निधन झाले त्यांच्या निधनामुळे संगीत व कलाविश्वाचे अपरिमित हानी झाली आहे. भारतीय संगीत क्षेत्रात त्यांचे अतुलनीय योगदान आहे.

महाविद्यालयातील श्रद्धांजली कार्यक्रमाला मा. प्राचार्य डॉ. जयंत म. चतुर, (श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ), प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे (कार्यक्रम अधिकारी, राट्रीय सेवा योजना) व प्रा. दिगांबर वानखेडे (सह–कार्यक्रम अधिकारी) महाविद्यालयातील प्रा. जयदेव वानखेडे, प्रा. डॉ. कल्पना गोडघाटे, प्रा. वंदना इंगोले, प्रा. डॉ. विशाखा डेरे, प्रा. नितु शेंडे, प्रा. निलेश औतकर, प्रा.डॉ. सिद्धार्थ जाधव, प्रा. डॉ. निखिलेश नलोडे, प्रा. डॉ. संजय राचलवार डॉ. राजाभाऊ बाजड, प्रा.डॉ. सुरेखा मंत्री, संस्थेतील इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयातील कार्यक्रमाला ४५ रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते .

प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे
राट्रीय सेवा योजना

प्राचार्य डॉ. जयंत म. चतुर,
श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय




भारत रत्न लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

नमो महाराष्ट्र

यवतमाळ शनिवार
१२ फेब्रुवारी २०२२



## थोडक्यात



### भारतरत्न लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

यवतमाळ । जिल्हा विकास समिती यवतमाळ द्वारा संचालीत श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ येथे दि . १० फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पीत करण्यात आली. भारत रत्न लता मंगेशकर यांचे दि ६ फेब्रुवारी २०२२ रोजी दुःखद निधन झाले त्यांच्या निधनामुळे संगीत व कलाविश्वाचे अपरिमित हानी झाली आहे. भारतीय संगीत क्षेत्रात त्यांचे अतुलनीय योगदान आहे. महाविद्यालयातील श्रद्धांजली कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. जयंत म. चतुर, श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ, प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना व प्रा. दिगांबर वानखेडे सह- कार्यक्रम अधिकारी महाविद्यालयातील प्रा.जयदेव वानखेडे, प्रा. डॉ. कल्पना गोडघाटे, प्रा. वंदना इंगोले, प्रा.डॉ. विशाखा ढोरे, प्रा. नितु शेंडे, प्रा. निलेश औतकर, प्रा. डॉ. सिद्धार्थ जाधव, प्रा. डॉ.निखिलेश नलोडे, प्रा. डॉ. संजय राचलवार, डॉ.राजाभाऊ बाजड, प्रा.डॉ.सुरेखा मंत्री, संस्थेतील इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयातील कार्यक्रमाला ४५ रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

# महावितरणकडून वीजपुरवठ्याची उच्चांकी झेप तब्बल २३०७५ मेगावॅटचा विक्रमी वीजपुरवठा

प्रतिनिधी । अमरावती

मागणीनुसार वीजपुरवठा करण्याचे आजवरचे सर्व विक्रम मोडीत काढत उच्चांकी झेप घेत मंगळवारी (दि. ८ फेब्रुवारी) महावितरणने विक्रमी २३ हजार ७५ मेगावॅट विजेचा पुरवठा केला आहे. मुंबई वगळता राज्याच्या उर्वरित भागात व महावितरणच्या कार्यक्षेत्रात आजवरच्या या सर्वाधिक मागणीप्रमाणे चोख नियोजनातून वीजपुरवठा करून महावितरणने वीजपुरवठ्याचा आजवरचा नवा विक्रमी टप्पा गाठला आहे. याआधी दि. ९ मार्च २०२१ रोजी २२ हजार ३३९ मेगावॅट विक्रमी विजेचा पुरवठा करण्यात आला होता.

राज्यात उन्हाच्या झळा हळूहळू वाढायला सुरवात झाली आहे. त्यामुळे विजेचा वापर वाढला आहे. सोबतच कृषिपंपांद्वारे विजेचा वापर देखील वाढला आहे. परिणामी गेल्या काही दिवसांपासून विजेच्या मागणीत सातत्याने वाढ सुरु आहे. यामध्ये मंगळवारी (दि. ८) राज्यात मुंबईसह तब्बल २५ हजार ९५५ मेगावॅट विजेची मागणी नोंदविण्यात आली. मुंबई वगळता राज्याच्या उर्वरित कार्यक्षेत्रात महावितरणकडून सुमारे २ कोटी ८१ लाख ग्राहकांना आजवरच्या उच्चांकी २३ हजार ७५ मेगावॅट विजेचा सुरळीत व अखंडित पुरवठा करण्यात आला. विजेची ही विक्रमी मागणी पूर्ण करताना राज्याच्या कोणत्याही भागात विजेचे भारनियमन करण्यात आले नाही, हे उल्लेखनीय.


महावितरणच्या विक्रमी कामगिरीबद्दल राज्याचे ऊर्जामंत्री ना. डॉ. नितीन राऊत व ऊर्जा राज्यमंत्री ना. श्री. प्राजक्त तनपुरे यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे. ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनात आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांच्या नेतृत्वात विविध स्त्रोतांमधून उपलब्धतेचे नियोजन करीत विजेची ही विक्रमी मागणी पूर्ण करण्यात आली. महावितरणने आतापर्यंत केलेल्या वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण व विस्तारीकरणासोबतच दैनंदिन देखभाल व दुरुस्तीच्या कामाचे हे यश आहे. त्यामुळे तब्बल २३ हजार मेगावॅटपेक्षा अधिक क्षमतेच्या विजेचे वहन सध्या अस्तित्वात असलेल्या वीजयंत्रणेमधून शक्य झाले आहे.

महावितरणने दीर्घकालीन वीजखरेदी करार असलेल्या वीजनिर्मिती कंपन्यांकडून त्यात सर्वात जास्त महानिर्मिती ६ हजार ८७४ मेगावॅट, एनटीपीसी व एनपीसीआयएलकडून एकूण ४ हजार १५४ मेगावॅट तसेच अदानी पॉवर, रतन इंडिया, सीजीपीएल, जेएसडब्ल्यू, साई वर्धा, एम्पो या खासगी प्रकल्पांमधून ४ हजार ८५३ मेगावॅट वीज उपलब्ध झाली आहे. सोबतच नवीन व नवीकरणीय ऊर्जेच्या स्त्रोतांमधून सौर ऊर्जा- २३३५ मेगावॅट, पवन ऊर्जा- १६६ मेगावॅट तसेच सहवीजनिर्मिती प्रकल्पांतून १२०० मेगावॅट असे एकूण ३ हजार ९९१ मेगावॅट वीज उपलब्ध झाली.

उर्वरित विजेची मागणी ही कोयना, घाटघर व इतर जलविद्युत प्रकल्पांतून १ हजार ३२० मेगावॅट वीजनिर्मिती करून तसेच मुक्त ग्राहक व रेल्वेच्या वीजनिर्मिती स्त्रोतातून १ हजार ३५३ मेगावॅट आणि पॉवर एक्स्चेंजमधून ६३० मेगावॅट विजेची खरेदी करून पूर्ण केली.

## अर्थशास्त्र प्रबोधन मंडळ यवतमाळ द्वारा केंद्रीय अर्थसंकल्पावर ऑनलाईन चर्चासत्र

प्रतिनिधी । यवतमाळ



संधी उपलब्ध होण्याची शक्यता वर्तवीली. प्रकाश चोपडा यांनी

## चंपतरावजी नागराळे यांना भावपूर्वक श्रद्धांजली

प्रतिनिधी । यवतमाळ

येथील भाजी मार्केटचे एकता फळ व भाई त्यांचे परम मित्र, अन्नपूर्णा किराणा स्टोर रमजान भाइ, कवडूजी नागराळ महादेवराव गढम,उमाबाई,अनिता बढसकर, साहित्या